सार्वजनिक आरोग्य विभागाचे राज्य प्रशिक्षण धोरण राबविण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४६ /क्षमता बांधणी ई क्र. १३२०३९३

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ०७ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१.महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/ ०९/१२-अ दिनांक २३ सप्टेंबर २०११

२. शासन निर्णय क्रमांक सा.प्र.वि. टीआरएन-२०११/प्र.क्र.२८४/११/१२-अ दि.२० मे २०१३

३. शासन परिपत्रक क्र.सा.प्र.वि. टीआरएन-२०१४/३४२/प्र.क्र. ५०/१४/१२-अ दि.२७ मे २०१४.

४. शासन निर्णय क्रमांक टीआरएन-२०१५/प्र.क्र.६०/१५/१२-अ दि.२४ जुन २०१५ (Clss-३)

५. शासन परिपत्रक क्र. टीआरएन-२०१४/२४३/प्र.क्र.३८/१४/१२-अ दि.२२ एप्रिल २०१५.

६. शासन निर्णय क्रमांक २०१५-२०१५/प्र.क्र.२५८/आरोग्य-३ दिनांक २४ मे २०१६

**प्रस्तावना :-**

राज्य स्तरावर राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था (SIHFW), नागपूर ही सर्वोच्च प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत असून, तिच्या अंतर्गत विभागीय स्तरावर आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (७), जिल्हा स्तरावर जिल्हा प्रशिक्षण केंद्र (३४) व रुग्णालय प्रशिक्षण केंद्र (२९) व तालुका स्तरावर (७) तालुका प्रशिक्षण केंद्रांचे जाळे आहे. राज्यातील संपूर्ण प्रशिक्षण संस्था "सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर" यांच्या तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रणाखाली आणून प्रशिक्षण संस्थाचा प्रशिक्षण आराखडा अद्यावत करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे. हे धोरण प्रशिक्षणाला केवळ एक प्रशासकीय गरज न मानता, ती विभागाच्या एकूण मानव संसाधन विकासातील एक महत्त्वाची गुंतवणूक आहे.

गुजरात तथा कर्नाटक राज्यांप्रमाणे व National Training Policy-२०१२ च्या धरतीवर प्रशिक्षण संस्थांना प्रभावीपणे कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी त्यांना पुरेशी आर्थिक आणि कार्यात्मक स्वायत्तता देण्यात आलेली नाही. त्याचबरोबर सध्या सार्वजनिक आरोग्य विभागातील इतर BUREAU जसे की TUBERCULOSIS,LEPROSY, MALARIA, etc चे प्रशिक्षण आराखडा व वेळापत्रक राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था (SIHFW), नागपूर यांचे अधिपथ्याकाली येत नाही. त्यामुळे प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये एकसुत्रता राहत नाही. १२ व्या सी.आर.एम. (CRM) अहवालातील शिफारशींनुसार, जिल्हा आणि रुग्णालय स्तरावरील प्रशिक्षण पथकांमध्ये तांत्रिक प्रशिक्षणाबाबतच्या क्षमतेचा अभाव असल्याचे नमूद केले आहे.

हे प्रशिक्षण धोरण राज्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दी आणि पर्यायाने आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरण तसेच राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्थामध्ये एकसूत्रता आणण्यासाठी एक मार्गदर्शक आराखडा म्हणून कार्य करेल. याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय**

सार्वजनिक आरोग्य विभागासाठी निश्चित करण्यात आलेले प्रशिक्षण धोरण महाराष्ट्र राज्याच्या प्रशिक्षण धोरणातील तरतुदीनुसार सुसंगत असेल. त्यानुसार राज्य स्तरावर सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत तांत्रिक/ प्रशासकिय प्रशिक्षण देण्याचे काम संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था नागपूर (SIHFW) येथे तसेच विभागीय स्तरावर विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (HFWTC) व जिल्हा स्तरावर जिल्हा प्रशिक्षण पथक (DTT)व रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र (HTC) येथे सुरू आहेत. या संस्था पुढील काळातही तांत्रिक प्रशिक्षणासाठी शिखर प्रशिक्षण संस्था/ विभागीय प्रशिक्षण संस्था/ जिल्हा प्रशिक्षण संस्था अशा तीन स्तरावर कार्यरत राहतील.

२. प्रशिक्षणाचे दृष्टीकोन, ध्येय आणि उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

**दृष्टीकोन** (Vision):- सुलभ आणि समन्यायी आरोग्य सेवांच्या माध्यमातून सर्व नागरिकांचे, विशेषतः वंचित घटकांच्या आरोग्य आणि कल्याणाचे रक्षण करणे आणि त्यास चालना देणे.

**ध्येय** (Mission):- आरोग्य व्यावसायिक आणि वैद्यकीय व्यावसायिकांच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक क्षमतांचे निरंतर बळकटीकरण करणे, जेणेकरून ते संवेदनशील, वचनबद्ध आणि सर्जनशील व्यक्ती म्हणून सर्वांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अधिक सुसज्ज होतील.

**उद्दिष्टे** (Objectives):- सार्वजनिक आरोग्य आणि संबंधित विषयांवर राज्यस्तरीय 'अध्ययन आणि क्षमता विकास संस्था' म्हणून कार्य करणे.

* आरोग्य व्यावसायिकांसाठी त्यांच्या गरजा आणि आरोग्याशी संबंधित गुंतागुंत लक्षात घेऊन क्षमता वृद्धी कार्यक्रमांचे पुनरावलोकन, नियोजन, धोरण आखणी आणि डिझाइन करणे.

* क्षमता विकास प्रोग्रामिंगमधील नवीन दृष्टिकोनांचे दस्तऐवजीकरण आणि प्रसार करणे, जेणेकरून प्रशिक्षण कार्यक्रम संबंधित आणि अर्थपूर्ण राहतील.

* व्यावसायिकांना मार्गदर्शन (Mentoring) आणि प्रत्यक्ष सहकार्य (Handholding support) देऊन आरोग्य कार्यक्रमांच्या गुणवत्तेत सुधारणा सुनिश्चित करणे.

* समुदाय आणि रुग्णांशी संवाद मजबूत करण्यासाठी नवीन पद्धती, प्रक्रिया आणि सराव सुरू करणे, जेणेकरून वर्तणुकीशी संबंधित आव्हाने पेलता येतील.

३. राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था नागपूर (SIHFW)हे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शिखर प्रशिक्षण (Nodal) संस्था म्हणून कार्यरत राहील. सर्वांगिण शिखर संस्थेची कार्ये खालीलप्रमाणे असतील.

१) सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण संस्थांच्या सोईसुविधांचे बळकटीकरण राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था नागपूर (SIHFW) यांचे मार्फत करण्यात येईल.

२) राज्य / विभागीय स्तरावर राष्ट्रीय आरोग्य अभियान / विविध आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / अशासकिय संघटना (युनिसेफ, जपायगो, जागतिक आरोग्य संघटना, आयसीएमआर, एनआयएचएफडब्ल्यु, पाथ, युएनडीपी, पीएचएफआय इ.) यांच्या सहकार्याने करण्यात येईल.

३) प्रशिक्षण संस्थांना सोसायटी ॲक्ट/ कंपनी अधिनियम अंतर्गत स्वायत्ता प्रदान करणे करिता नोंदणी करण्यात यावी. जेणेकरून सद्यस्थितीत असलेल्या कार्यपद्धतीमध्ये बदल होऊन संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी मर्यादित अधिकारांमध्ये न राहता योग्य निर्णय घेणे सुकर होईल.

४) राज्यातील सर्व आरोग्य प्रशिक्षण संस्थांसाठी विविध गुणवत्ता मानके निश्चित करणे, पायाभूत व बढती नंतरच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करणे. विषय वस्तु(Content)बाबत मार्गदर्शन करणे.

५) परिणामकारक प्रशिक्षणासाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करणे, मुल्यमापन करणे तसेच प्रशिक्षण पुस्तिका तयार करणे, आवश्यकतेनुसार प्रशिक्षण पुस्तिकांचे भाषांतर करणे.

६) सर्व आरोग्य प्रशिक्षण संस्थेतील संस्थाप्रमुख व विद्याशाखा सदस्य यांच्या लेखा/आस्थापना विषयक बाबी साभांळणे.

७) सर्व प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशासकिय नियोजन व संनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येईल. संस्थेतील प्रशिक्षणाचे नियोजन तसेच प्रशिक्षणाच्या निविष्ठा (Input) प्रक्रिया व प्रशिक्षणाचे परिणाम यांचे संनियंत्रणाची जबाबदारी संबंधित कक्ष सांभाळेल.


८) प्रशिक्षण संस्थेसाठी ५ वर्षाची प्रशिक्षण रुपरेषा व वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करणे.

९) प्रत्येक पदाला आनुषंगिक अशा प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण अहवाल तयार करणे.


१०) कर्मचाऱ्यांची योग्य प्रशिक्षणासाठी निवड करणे तसेच सेवाप्रवेश व पदोन्नती अंतर्गत झालेल्या अधिकाऱ्यांना उजळणी प्रशिक्षण देणे व गरजेनुसार परीक्षापध्दती विकसीत करणे.

११) प्रशिक्षण कार्यक्रम व प्रत्यक्ष कामकाज यांचा समन्वय साधणे.

४. सार्वजनिक आरोग्य विभाग प्रशिक्षण संस्थांची प्रशासकीय व संस्थात्मक संरचना खालीलप्रमाणे आहे.



## राज्य आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय कार्यप्रणाली




६. **राज्य प्रशिक्षण धोरण अंमलबजावणी समिती-**

१) मार्गदर्शक समिती व तिच्या कार्यकक्षा परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे गठण करण्यात येत आहे.

२) नियामक समिती व तिच्या कार्यकक्षा परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे गठण करण्यात येत आहे.

३) कार्यकारी समिती व तिच्या कार्यकक्षा परिशिष्ट-क मध्ये नमूद केल्याप्रमाणे गठण करण्यात येत आहे.

४) विभागाचे प्रशिक्षण विषयक अंमलबजावणीची नियमावली परिशिष्ट-ड मध्ये नमूद करण्यात आली आहे.

**७.** राज्य प्रशिक्षण धोरणाच्या मध्यवर्ती कल्पनेनुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्य प्रशिक्षण धोरणामध्ये खालील बाबी समाविष्ट आहेत.

१) सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यासांठी प्रशिक्षण असेल.

२) सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण सोयी, सुविधांचे बळकटीकरण व योग्य वापर करण्यात येईल.

३) आवश्यकतेनुसार विभागीय व जिल्हा प्रशिक्षण केंद्र व तालुका स्तरावरील प्रशिक्षण केंद्राची निर्मीती करण्यात येईल.

४) अ.क्र.२ येथील शासन निर्णयानुसार प्रशिक्षण अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा नियमांशी निगडीत करण्यात येईल.

५) प्रत्यक्ष प्रशिक्षण आराखडा तयार करणे व त्यानुसार प्रशिक्षणासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करणे.

६) विभागाच्या मानव संसाधन विकासाबरोबर प्रशिक्षण जोडले जाईल.

७) सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण संस्थांच्या सोयी सुविधांचे बळकटीकरण सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर यांचे मार्फत करण्यात येईल.

८) राज्य / विभागीय स्तरावर राष्ट्रीय आरोग्य अभियान / विविध आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / अशासकिय संघटना (युनिसेफ, जपायगो, जागतिक आरोग्य संघटना, आयसीएमआर, एनआयएचएफडब्ल्यु, पाथ, युएनडीपी, पीएचएफआय इ.) यांच्या सहकार्याने करण्यात येईल.

**८. प्रशिक्षणाचे प्रकार**

सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यासतांत्रिक, प्रशासकिय व सेवांतर्गत प्रशिक्षण आवयश्यकतेनुसार राज्यस्तर, देशपातळीवर किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

- **प्रारंभिक (Induction) प्रशिक्षण:** सेवेत रुजू झाल्यावर १ वर्षाच्या आत पूर्ण करणे अनिवार्य आहे.
- **पदोन्नती प्रशिक्षण:** पदोन्नतीसाठी शिफारस केलेल्या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे.
- **मध्य-स्तर उजळणी अभ्यासक्रम:** सेवेच्या ४ ते ६ वर्षांच्या दरम्यान.
- **प्रगत/वरिष्ठ स्तर अभ्यासक्रम:** १० वर्षांच्या सेवेनंतर.

**९. प्रशासकिय व सेवातंर्गत प्रशिक्षणाची रचना तसेच अंमलबजावणीचा आराखडा-**

१) सदर प्रशिक्षणाचे उद्दिष्ट हे ज्ञान, कौशल्य आणि दृष्टीकोण यामधील यथायोग्य बदल करण्यासाठी राहील.

२) सदर प्रशिक्षण, प्रशासनाची सर्वसाधारण क्षमता बांधणी, प्रेरणा व सुयोग्य कामकाजासाठी अतिशय महत्वाचे असल्याने सर्व पदांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सदर प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहिल.

३) प्रशिक्षणाची बांधणी, आखणी, तज्ञप्रशिक्षक तयार करणे, मुल्यमापन, परिक्षेचे वेळापत्रक ठरविणे व प्रमाणपत्रे देणे आदी कामे पाहणारी विकास संस्था म्हणून सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर व विभागीय आरोग्य प्रशिक्षण संस्था तसेच जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्राकडे असेल. हे प्रशिक्षण सर्व पदांवरील कर्मचाऱ्यांना विशेषतः त्या पदावर नियुक्त झाल्यानंतर बंधनकारक राहील.

महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना तक्त्यामध्ये नमुद केल्या प्रमाणे प्रशिक्षण देण्यात येईल.

**१०. समांतर प्रशिक्षण** (Horizontal Training)

**अ) पायाभूत प्रशिक्षण कालावधी**

| **गट** | **कालावधी** |
|---|---|
| अ | ६ आठवडे |
| ब | ६ आठवडे |
| क | २ आठवडे |
| ड | १ आठवडा |

१) पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नवनियुक्त अधिकारी / कर्मचाऱ्यांना मूळ मुख्यालयी रुजू होण्यापूर्वी प्रशिक्षणास पाठविण्यात येईल. अथवा पायाभुत प्रशिक्षण रुजु झाल्यापासून ६ महिन्यात पुर्ण करणे आवश्यक राहील.

२) परिविक्षाधिन कालावधी समाप्तीच्या आदेशासाठी पायाभुत प्रशिक्षण समाधान कारकरित्या पुर्ण करणे अनिवार्य असेल. प्रशिक्षणार्थींनी पायाभूत प्रशिक्षण समाधानकारकरीत्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

**आ) पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण कालावधी**

| **गट** | **कालावधी** |
|---|---|
| अ | २ आठवडे |
| ब | २ आठवडे |
| क | १ आठवडे |

१) पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण विशेषतः पदोन्नतीनंतर बदललेल्या जबाबदाऱ्या व कामाचे स्वरुप याबद्दल असल्याने प्रशासकीय प्रशिक्षणाचा कालावधी विभागाचे प्रशिक्षण धोरणाच्या तरतूदीनुसार असेल.

२) तांत्रिक/प्रशासकिय प्रशिक्षणाबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध स्तरांवरील प्रशिक्षण संस्थाकडून प्रशिक्षणाचे नियोजन व आयोजन करण्यात येते ते विभागाच्या तांत्रिक / प्रशासकिय प्रशिक्षण कार्यक्रमानुसार घेण्यात येईल. (सदरचे प्रशिक्षण पदोन्नती नंतरच्या१ वर्षात पुर्ण करणे आवश्यक राहील.)

**इ) उजळणी प्रशिक्षण**

१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत कार्यरत सर्व संवर्गाकरीता उजळणी प्रशिक्षण किमान ४ ते ६ वर्षातून एकदा देण्यात येईल.

२) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध स्तरांवरील प्रशिक्षण संस्थाकडून प्रशिक्षणाचे नियोजन व आयोजन करण्यात येईल.

३) प्रशिक्षणाचा कालावधी ३ दिवसांसाठी असेल.

**ई) कौशल्य प्रयोगशाळा (Skill Lab) प्रशिक्षण**

१) हे २८ दिवसांचे निवासी प्रशिक्षण असेल.
२) यामध्ये २० दिवस कौशल्य प्रयोगशाळेत सराव आणि ८ दिवस जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष (Hands-on) प्रशिक्षण दिले जाईल.
३) **प्रशिक्षक-प्रशिक्षणार्थी प्रमाण:** १:३ असेल.
४) **स्तर:** मूलभूत (प्रारंभिक प्रशिक्षणापासून वंचित असलेल्यांसाठी) आणि प्रगत (विशिष्ट कौशल्यांसाठी) अशा दोन विभागांत विभागलेले असेल.

११. **अनुलंब प्रशिक्षण (Vertical Training) परिशिष्ट-इ मध्ये सविस्तर माहिती सोबत जोडली आहे.**

१२. <u>प्रशिक्षण कार्यक्रम वार्षिक नियोजन प्रक्रिया (Annual Training Plan)</u>

- **संस्थास्तर**

उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामिण, उपजिल्हा, जिल्हा रुग्णालय व इतर रुग्णालये :-

✔ संस्था स्तरावरील प्रशिक्षीत/ अप्रशिक्षीत संवर्ग निहाय माहिती (Training Matrix) तयारकरणे.

**कालमर्यादाः**-पहिला व दुसरा आठवडा ऑक्टोंबर

- **जिल्हास्तर**

<u>जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्र (DHTC)</u> :-

✔ Training Matrix आधारे प्रशिक्षीत व अप्रशिक्षीत मनुष्यबळाची माहिती घेवून सर्व आरोग्य विषयक कार्यक्रमांचा प्रशिक्षण आराखडा तयार करणे. कार्यान्वीत असलेल्या तालुक्यांना प्रशिक्षण केंद्रांच्या कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्थांचा आराखडा घेवुन समाविष्ठ करणे.

✔ प्रशिक्षणाची गरज (Training Need Assessment ), प्रशिक्षण संस्था/ केंद्र यांची क्षमता तपासुन वार्षिक उद्दिष्ट ठरविणे.

**कालमर्यादाः**- तिसरा आठवडा ऑक्टोंबर

- **विभागीय स्तर**

**विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व) :-**

✔ विभागांतर्गत उपलब्ध सर्व प्रशिक्षण केंद्रांकडुन प्रशिक्षण कृती आराखडा मागवुन एकत्रित करणे.

✔ वैद्यकिय अधिकारी व विशेषज्ञ यांचे ज्ञान व कौशल्य वृदधींगत करणे करीता विभागीय स्तरावर आखणी करणे.

✔ प्रशिक्षण भाराच्या अनुषंगाने नवीन कौशल्य प्रशिक्षण केंद्र (Skill Training Site) निवड करणे.

**कालमर्यादाः**-पहिला आठवडा नोव्हेंबर

- **राज्यस्तर**

**सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूरः-**

✔ आरोग्य विभागातील सर्व कार्यक्रम प्रमुखांकडुन त्यांच्या संबंधीत कार्यक्रमाचा प्रशिक्षण कृती आराखडा मागवुन घेवुन एकत्रित करणे.

✔ प्रशिक्षण भाराच्या अनुषंगाने अंमलबजावणीसाठी वार्षिक वेळापत्रक तयार करणे.

✔ सर्व कार्यक्रम प्रमुखांची दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करुन अंतिम कृती आराखडा आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडे पाठविणे.

**कालमर्यादा :**-दुसरा व तिसरा आठवडा नोव्हेंबर

१३. **अन्य प्रशिक्षण संस्था सोबत समन्वय/सहयोग (Collaborations)**

१) राज्यातील इतर प्रशिक्षण संस्था, यशदा, राज्य आरोग्य संसाधन केंद्र, केंद्रशासनाच्या प्रशिक्षण संस्थां National Institute of Health and Family Welfare, National Health System RecourseCenter अं आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचा, महिला व बाल विकास, आयुष (AYUSH), पेयजल व स्वच्छता, शिक्षण आणि पंचायती राज संस्था या विभागांशी; तसेच UNICEF, PATH, JHAPIEGO, CARE, SHSRC, Vanamati, YASHADA, LABASSANA, DMER, MUHS, TATA, TISS,

IPHS,आणि इतर अभिमत विद्यापीठांसारख्या विकास भागीदारांशी समन्वय साधून प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.

२) विविध स्तरांवरील प्रशिक्षकांनी, NRHM अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'ग्राम आरोग्य आणि स्वच्छता समिती'च्या (Village Health and Sanitation Committee) सदस्यांना दिशादर्शन (orientation) देण्यासाठी आपल्या क्षमतेचा सातत्याने वापर केला पाहिजे. राज्य, प्रादेशिक आणि जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षकांनी, क्षेत्रस्तरावर (field) ASHA, AWW आणि ANM यांच्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या तळागाळातील प्रशिक्षण कार्यक्रमांचा समावेश करणे.

३) DHFWTC/DTC यांनी, विविध संस्थांमध्ये अस्तित्वात असलेल्या 'रुग्ण कल्याण समित्या', 'जनआरोग्य समित्या' किंवा तत्सम समित्यांमध्ये कार्यरत असलेल्या पंचायती राज संस्थांच्या (PRI) प्रतिनिधींना दिशादर्शन देण्याच्या प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होणे.

४) 'आयुष' (AYUSH) प्रणालीला मुख्य प्रवाहात आणणे ही NRHM ची एक प्रमुख रणनीती आहे. राज्य, प्रादेशिक आणि जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण संस्थांमधील प्राध्यापक/प्रशिक्षक वर्गाने, आयुष कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे आणि दिशादर्शनाचे कार्य सुलभ करून देणे.

५) आरोग्य क्षेत्रातील प्रशिक्षण संस्थांनी, महिला व बाल विकास विभागाच्या प्रशिक्षण प्रणालीशी योग्य समन्वय साधला पाहिजे. यामुळे ICDS आणि महिला सक्षमीकरणाशी संबंधित कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी पुढे नेण्यास मदत करणे.

६) त्याचप्रमाणे, 'किशोरवयीन मैत्रीपूर्ण आरोग्य सेवा' (RKSK), HIV/AIDS प्रतिबंध आणि प्रजनन आरोग्य यांसारख्या विषयांची अंमलबजावणी; शिक्षण क्षेत्र आणि वैद्यकीय महाविद्यालयांसह आरोग्य क्षेत्रातील प्रशिक्षण संस्था यांच्यातील प्रभावी समन्वयाद्वारे यशस्वीपणे साध्य करणे.

**१४. आर्थिक तरतूद -**

१) सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर वर्षाच्या सुरवातीला प्रशिक्षण आराखडा करेल व त्यानुसार त्या आर्थिक वर्षाच्या त्या शासकीय विभागाच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करेल. सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर, विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था (DHTC) तसेच जिल्हा आरोग्य प्रशिक्षण (DHFWTC) केंद्रासाठी लागणारी आर्थिक तरतूद त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात येईल. सदर प्रशिक्षण धोरण योजना म्हणून राबविण्यात येईल.

२) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत लेखा शिर्षक २२१०/२२११ तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत (सर्व प्रमुख कर्यालय) यांना उपलब्ध होणारा निधी व इतर विकास निधी व विकास भागीदार करणाऱ्या संस्थांमार्फत उपलब्ध होणारा निधी यांची एकत्रित मागणी, वितरणे व मूल्यमापन सनियंत्रण हे सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर स्तरावरून करण्यात येईल.

३) केंद्र शासन पुरस्कृत योजना द्वारे प्राप्त होणारा निधी यांची एकत्रित मागणी, वितरणे व मूल्यमापन सनियंत्रण हे सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर स्तरावरून करण्यात येईल.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०७१६५५३८७२१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ARVIND BHIMRAO MORE

Digitally signed by ARVIND BHIMRAO MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=203AF2DFBA7DB2A4824298A34F2C9294F93396F53D7F87CD4D69FECF5CF7005F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9246B8CCD2E2CB10707678D45EA1AD26CC1E4D7BFF7BD2AA1F253A716B8C448B, cn=ARVIND BHIMRAO MORE
Date: 2026.08.07 18:43:48 +05'30'

**(अ. भि. मोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा-१, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
५. संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर
६. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर, अमरावती, कोल्हापूर, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर , ठाणे
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई/नागपूर .
१०.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
११.निवडनस्ती (क्षमता बांधणी) .

## परिशिष्ट-अ

### मार्गदर्शक समिती

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २. | मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, मुंबई | सहअध्यक्ष |
| ३. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव १, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव २, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ५. | आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राआअ, मुंबई | सदस्य |
| ६. | सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई | सदस्य |
| ७. | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई/पुणे/शहरी (मुंबई) | सदस्य |
| ८. | अतिरिक्त संचालक, राज्य आरोग्य कुटुंब कल्याण, पुणे | सदस्य |
| ९. | अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| १०. | सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य |
| ११. | सहसंचालक (तांत्रिक), रा.आ.अ., मुंबई | सदस्य |
| १२. | उपसंचालक (प्रशिक्षण), विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद, नागपूर/पुणे | २ सदस्य |
| १३. | संचालक,सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर | सदस्य सचिव |

### मार्गदर्शक समितीची कार्यकक्षा

१) सार्वजनिक आरोग्य विभागातील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वृध्दींगत करणेकरीता राज्यप्रशिक्षण धोरणाची निर्मिती तथा त्याबाबत वेळोवेळी अद्यावतीकरण करणे.

२) विभागातील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणाकरीता आवश्यक असलेल्या प्रशिक्षणांची रुपरेषा तयार करुन आढावा घेणे.

३) राज्यातीलसर्व प्रशिक्षण संस्थांचे पायाभूत सुविधा आणि मानव संसाधन बाबींवर आढळून आलेल्या त्रुटीबाबत मार्गदर्शन करणे.

४) सार्वजनिक आरोग्य विभागातील प्रशिक्षण संस्थाचे कार्यप्रणालीसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे.

५) सभा वर्षातून दोनदा घेणे बंधनकारक राहील.

## परिशिष्ट-ब

## सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर करीता नियामक समिती निर्मिती

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | आयुक्त तथा अभियान संचालक, आरोग्य सेवा, मुंबई | अध्यक्ष |
| २. | संचालक, सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर | सहअध्यक्ष |
| ३. | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई/पुणे/शहरी (मुंबई) | सदस्य |
| ४. | उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे / नागपूर | सदस्य |
| ५. | उपसंचालक (प्रशिक्षण), विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व) | सदस्य |
| ६. | जिल्हा शल्य चिकित्सक (२) चक्राकार पध्दतीने | सदस्य |
| ७. | जिल्हा आरोग्य अधिकारी (२) चक्राकार पध्दतीने | सदस्य |
| ८. | वैद्यकिय अधिकारी, जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्र (DHTC) (२) चक्राकार पध्दतीने | सदस्य |
| ९. | उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर | सदस्य, सचिव |

**नियामक समितीची भूमिका आणि जबाबदाऱ्याः**

६) एका वर्षात किमान दोन बैठका आयोजित करणे.

७) राज्यातील प्रशिक्षण आराखडा पुर्नरावलोकन करणे व सुधारणा सुचविणे.

८) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पीआयपी, पायाभूत सुविधांचे कार्य, मानव संसाधन आणि इतर प्रस्तावांचे पुर्नरावलोकन आणि मंजुरी प्रदान करणे.

९) राज्यातील विविध प्रशिक्षणसंस्थाकडूनतसेच कार्यकारी समितीकडून प्राप्त प्रस्तावांना तांत्रिक आणि प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे.

१०) विविध लेखाशिर्षातंर्गत राज्य शासनाकडून प्राप्त निधिच्या विनियोगाचे धोरण ठरविणे.

## परिशिष्ट-क

## सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर करीता कार्यकारी समिती निर्मिती

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | संचालक, सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर | अध्यक्ष |
| २. | उपसंचालक १, सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर | सहअध्यक्ष |
| ३. | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई/पुणे/शहरी (मुंबई) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | उपसंचालक २, सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर | सदस्य |
| ५. | कार्यकारी संचालक, एसएचएसआरसी, पुणे | सदस्य |
| ६. | प्रशासकिय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर | सदस्य सचिव |

**कार्यकारी समितीची भूमिका आणि जबाबदाऱ्याः**

१) प्रतीमाह सभा आयोजित करणे.

२) राज्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढीसाठी संस्थानिहाय पाच वर्षांचा प्रशिक्षण आराखडा तयार करणे.

३) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रशिक्षण सत्रे, पायाभूत सुविधांचे कार्य, मानव संसाधन आणि इतर प्रस्ताव तयार करणे.

४) नियामक समितीच्या मंजुरीसाठी सादर करावयाचे तांत्रिक आणि प्रशासकीय प्रस्ताव तयार करणे.

५) राज्यातीलसर्व प्रशिक्षण संस्थांचे पायाभूत सुविधा आणि मानव संसाधन बाबींवर आढळून आलेल्या त्रुटीबाबत प्रस्ताव तयार करणे.

६) सार्वजनिक आरोग्य विभागासाठी कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी गरजांवर आधारित प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार करणे.

७) सार्वजनिक आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या विविध संर्वगाचे प्रशिक्षण पश्चात मूल्यमापन प्रणाली तयार करणे.

८) प्रशिक्षण संस्था आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यांच्या देखरेख, समन्वय आणि मूल्यमापनासाठी योजना तयार करणे.

९) राज्यातील कौशल्य विकास विभाग / आदिवासी विभाग, ग्रामविकास विभाग व इतर शासकिय विभांगासोबत समन्वय साधून गरजांवर आधारित प्रशिक्षण तयार करणे.

१०) यशदा, वनामती या राज्याच्या प्रशिक्षण संस्थांच्या धर्तीवर आरोग्य प्रशिक्षण संस्था व तेथील पायाभूत सुविधा जसे की आहार, निवास, प्रशिक्षण कक्ष, दृकश्राव्य प्रणाली व तत्सम बाबी आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार इतर शासकीय/खाजगी कार्यासनांना प्रचलित शासन मान्य दरांनुसार वापरास अनुमती देणे व त्यामधून सदर संस्थेस प्राप्त होणारा निधी संबंधित संस्थेच्या विकासासाठी संबंधित संस्थेच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने विनियोग करण्यात यावा.

११) सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर यांना राज्यातील सर्व आरोग्य प्रशिक्षण संस्था संलग्न करण्यात येत असून यापुढे सार्वजनिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संचालनालय, नागपूर हे राज्यस्तरीय तांत्रिक व प्रशासकिय प्रशिक्षणासाठी शिखर संस्था म्हणून कार्यरत राहील व त्याची कार्ये खालीलप्रमाणे राहतील.

१२) राज्यातील सर्व आरोग्य प्रशिक्षण संस्थांसाठी विविध गुणवत्ता मानके निश्चित करणे, पायाभूत व बढती नंतरच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करणे. विषय वस्तु(Content)बाबत मार्गदर्शन करणे.

१३) परिणामकारक प्रशिक्षणासाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करणे, मुल्यमापन करणे तसेच प्रशिक्षण पुस्तिका तयार करणे, आवश्यकतेनुसार प्रशिक्षण पुस्तिकांचे भाषांतर करणे=

१४) सर्व आरोग्य प्रशिक्षण संस्थेतील संस्थाप्रमुख व विद्याशाखा सदस्य यांच्या लेखा/आस्थापना विषयक बाबी साभांळणे.

१५) सर्व प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशासकिय नियोजन व संनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येईल. संस्थेतील प्रशिक्षणाचे नियोजन तसेच प्रशिक्षणाच्या निविष्ठा (Input) प्रक्रिया व प्रशिक्षणाचे परिणाम यांचे संनियंत्रणाची जबाबदारी संबंधित कक्ष सांभाळेल.

१६) प्रशिक्षण संस्थेसाठी ५ वर्षाची प्रशिक्षण रुपरेषा व वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करणे.

१७) प्रत्येक पदाला आनुषंगिक अशा प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण अहवाल तयार करणे.

१८) कर्मचाऱ्यांची योग्य प्रशिक्षणासाठी निवड करणे तसेच सेवाप्रवेश व पदोन्नती अंतर्गत झालेल्या अधिकाऱ्यांना उजळणी प्रशिक्षण देणेव गरजेनुसार परीक्षापध्दती विकसीत करणे.

१९) प्रशिक्षण कार्यक्रम व प्रत्यक्ष कामकाज यांचा समन्वय साधणे.

## परिशिष्ट-ड

विभागाचे प्रशिक्षण विषयक अंमलबजावणी

१ नियमित आणि कंत्राटी (NHM/बाह्यस्त्रोत) कर्मचाऱ्यांसाठी मूलभूत आणि पदोन्नती प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार करणे. व सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे संवर्गनिहाय प्रशिक्षण सत्र आयोजित करणे.

२. राज्य प्रशिक्षण धोरणतंर्गत तयार करण्यात आलेले संवर्गनिहाय प्रशिक्षण, प्रशिक्षणाचा कालावधी, प्रशिक्षण स्थळ व अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येतील.

३. अधिकृत असलेल्या प्रशिक्षण स्थळाव्यतीरीक्त आवश्यकतेनुसार व निकषाप्रमाणे खाजगी व स्वयंसेवी संस्थाची प्रशिक्षण स्थळ म्हणून निवड करुन अशा संस्थामध्ये प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येईल.

४. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तांत्रिक प्रशिक्षण, प्रशासकिय व सेवांतर्गत प्रशिक्षण घेण्यात येतील.

५. सदर प्रशिक्षण प्रशासनाची सर्वसाधारण क्षमता बांधणी, प्रेरणा व सुयोग्य कामासाठी अतिशय महत्वाचे असल्याने सर्व पदावरील कर्मचाऱ्यांना सदर प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहील. प्रशिक्षणास गैरहजर असल्यास सदर प्रशिक्षणार्थी शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे कार्यवाहीस पात्र राहील. नवीन विषयाची तोंडओळख करण्यासाठी विशेष प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येतील.

६. आवश्यकतेनुसार आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षकाला इतर राज्यात, केंद्रशानाच्या प्रशिक्षण संस्थेत व आवश्यकतेप्रमाणे विदेशात प्रशिक्षण/परीषद/कार्यशाळा/ अभ्यास दौ-यासाठी पाठविण्यात येईल.

७. राज्यातील आरोग्य प्रशिक्षण संस्थांची गुणवत्ता वृध्दींगत करण्यासाठी त्या-त्या संस्थांनी आयएसओ मानांकन प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करतील व त्यानुसार सातत्यपुर्ण सेवा देण्यासाठी प्रयत्नशील असतील.

८. प्रशिक्षण संस्थांमध्ये नियुक्त करतांना अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे शैक्षणिक पात्रता प्रशिक्षणाचा अनुभव इत्यादी बाबी गृहीत धरुन नियुक्त करण्यात यावी.

९. प्रशिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी सध्या आरोग्य प्रशिक्षण संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या प्रशिक्षित अधिकारी व विद्याशाखा सदस्यांची स्थानंतरणाने त्यांचे सहमतीने पदस्थापना प्रशिक्षण संस्थामध्येच करण्यात येईल.

१०. राष्ट्रीय आरोग्य अभियान व प्रजनन व बाल आरोग्य (आरसीएच) या कार्यक्रमांतर्गत संबंधित प्रशिक्षणाचा खर्च भागविण्यात येईल व त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार पदांची निर्मिती करण्यात येईल.

११. राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशासकीय एकसूत्रता येण्याच्या दृष्टीने वरिष्ठ प्रशिक्षण संस्थेचे त्यापेक्षा कनिष्ठ प्रशिक्षण संस्थेवर प्रशासकीय नियंत्रण असणे अंत्यत आवश्यक आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे प्रशासकीय रचना कार्यप्रणाली कार्यरत राहील.

१२. पायाभूत प्रशिक्षण वर्ग 'अ' ते 'ड' ठरविलेल्या कालावधीनुसार पूर्ण केल्याशिवाय संबंधित संवर्गाच्या आस्थापनेत परीविक्षाधीन कालावधी संपवून नियमित पदावर रुजु होता येणार नाही, ही अट असेल.

१३. पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण वर्ग 'अ' ते 'ड' ठरविलेल्या कालावधीनुसार पूर्ण केल्याशिवाय संबंधित संवर्गास लागू असलेले आर्थिक व पदाचे शासकीय लाभ देय असणार नाहीत.

१४. प्रशिक्षणार्थीची निवड झाल्यानंतर संबंधित प्रशिक्षणार्थी सदर प्रशिक्षणास विना परवानगी अनुपस्थित राहिल्यास महाराष्ट्र सेवा नियम १९६१ अंतर्गत प्रशासकीय कार्यवाहीस पात्र राहील.

१५. सदर नियोजनात होणारा शासकीय आर्थिक खर्च संबंधितांकडून देय असलेल्या वेतनातून वेतन श्रेणीनुसार वसूल करण्यात येईल.

१६. विभागीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय, संस्थास्तरीय प्रमुख नियंत्रण अधिकारी यांनी संबंधित प्रशिक्षणार्थीस कोणत्याही सबबीखाली प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कार्यवाहीची तरतूद लागू राहील.

१७. आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि दृष्टिकोनात योग्य बदल घडवून आणणे हे या प्रशिक्षणाचे ध्येय आहे.

१८. हे प्रशिक्षण सामान्य क्षमता बांधणी, प्रेरणा आणि प्रशासनाच्या सुयोग्य कार्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून सर्व नियमित/कंत्राटी पदांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ते **अनिवार्य** असेल.

१९. आशा (ASHA), अंगणवाडी सेविका (AWW) आणि ए.एन.एम (ANM) याना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात राज्य व जिल्हा स्तरावरील प्रशिक्षकांनी सातत्याने सहभागी व्हावे.

परिशिष्ट-इ

अनुलंब प्रशिक्षण (Vertical Training)

| | Cadres | Courses | Nature of participants | Venue | Duration of the course (Days) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ASHA | HBNC 4, 5, 6 , HBYC &NCD | State ASHA Trainer | HFWTC Kolhapur | 6 |
| 2 | MO/SN/ANM/LHV | Skills Lab Training | MO/SN/ANM/LHV | SIHFW, Nagpur | 6 |
| 3 | MO/ANM/SN/CHO | Online GDM ToT | DRCHO, Gyn., MODTT, MOHTT, RMO,MOH, Nodal Officer Training Corp. | SIHFW, Nagpur **(Online Mode)** | 1 |
| 4 | Faculty of Training Insititutes & Training Nodal Officer Corportion | Online TOT Training RKS/Jas Member of UPHCs | Faculty of Training Insititutes & Training Nodal Officer Corportion | SIHFW, Nagpur **(Online Mode)** | 1 |
| 5 | MO/Ped./Obgy. Spec. | Online - 1 Day Family Participatary Care/KMC ToT | MO/Ped./Obgy. Spec. | SIHFW, Nagpur **(Online Mode)** | 1 |
| 6 | MO/Dentist | Online-Implementation of COTPA- 2003 Training | MO/Dentist | SIHFW, Nagpur **(Online Mode)** | 1 |
| 7 | Dental Surgeon | Online -Implementation of NOHP at CHC/SDH Training | Dental Surgeon | SIHFW, Nagpur **(Online Mode)** | 1 |
| 8 | ENT Surgeon | Online Training - Implementation of NPPCD | ENT Surgeon/Training Center Faculty/ DEIC Staff | SIHFW, Nagpur **(Online Mode)** | 1 |
| 9 | MO/ANM/SN | (Online) IMEP Training | Training Center Faculty/MODTT/MOHTT/Nodal Officer Trg/CQAC/DQAC | SIHFW, Nagpur **(Online** | 1 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **Mode)** | |
| 10 | Faculty of Training Insititutes & Training Nodal Officer Corportion | Microteaching and capacity building | Faculty of Training Insititutes & Training Nodal Officer Corportion | SIHFW Nagpur | 5 |
| 11 | Faculty of Training Institute | DHAP Training | Faculty of Training Institute | SIHFW Nagpur | 2 |
| 12 | MO/SN/CHO/ANM | Online Training - Snake Bite Prevention | MO/SN/CHO/ANM | SIHFW, Nagpur (**Online Mode)** | 1 |
| 13 | MO/Faculty of Training Institute | Master Trainer for ALS/BLS TOT | MO/Faculty of Training Institute | SIHFW Nagpur | 2 |
| 14 | MO & Health Care Staff | Sickel Cell | | SIHFW, Nagpur (**Online Mode)** | 1 |
| 15 | all Principals, Ayush MO, Training Faculty | TOT | All Principals, Ayush MO, Training Faculty | SIHFW | 2 |
| 16 | Ayush DPM/DEO | TOT | AYUSH DPM/DEO | SIHFW | 1 |

| Sr. No. | Programme Name | Cadres | Courses | Nature of participants | Venue | Duration of the course (Days) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Maternal health | MO (MBBS) | MTP (MO) | MO (MBBS) | HFWTC (7) | 18 |
| 2 | Maternal health | MO (MBBS) | MMA | MO (MBBS) | HFWTC (7) | 3 |
| 3 | Maternal health | ANM/GNM/SN | SBA | ANM/GNM/SN | HFWTC (7) | 21 |
| 4 | Maternal health | MO | BEmOC (MO) | MO | HFWTC (7) | 10 |
| 5 | Maternal health | Staff Nurse & Incharge & All Nursing Cadre | Training of LaQshya Facility Staff | Staff Nurse & Incharge & All Nursing Cadre | DTT/HTT | 3 |
| 6 | Maternal health | MO/ANM/SN/CHO | GDM TOT | MO/ANM/SN/CHO | HFWTC (Amravati, Ch. Sambhajinagar,Thane) | 1 |
| 7 | Maternal health | MO/ANM/SN/CHO | GDM Training | MO/ANM/SN/CHO | HFWTC (Amravati-19, Ch. Sambhajinagar-22,thane-19) | 2 |
| 8 | Maternal health | MO, SN, LT,ANM. | RTI/STI (LT) | MO, SN, LT,ANM. | HFWTC (6) | 5 |
| 9 | Maternal health | MO, SN, LT,ANM. | RTI/STI (ANM/SN) | MO, SN, LT,ANM. | HFWTC (7) | 2 |
| 10 | Maternal health | MO, SN, LT,ANM. | RTI/STI (MO) | MO, SN, LT,ANM. | HFWTC (7) | 2 |
| 11 | Maternal health | RBSK Team | Online - 1 Day Refresher training | MO/ANM/ Pharmacist | HFWTC (07) | 1 |
| 12 | | MO/Ped./Obgy. Spec. | Online - 1 Day Family Participatary Care/KMC Training | MO/Ped./Obgy. Spec. | HFWTC (7) | 1 |
| 13 | | MO/ANM | Online Adolscent Friendly Health Services Training | MO/ANM | HFWTC (7) | 1 |
| 14 | | MO | NSSK (MO) | MO | HFWTC Nagpur | 2 |
| 15 | | SN | NSSK (SN) | SN | HFWTC Nagpur | 2 |
| 16 | | ANM | NSSK (ANM) | ANM | HFWTC | 2 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 17 | | MO/SN | NBSU (Mo & SN) Regional | MO/SN | HFWTC | 2 |
| 18 | | Ped./MO/SN | CPAP Neonatel Ventilator Regional Level TOT (MO & SN) | Ped./MO/SN | HFWTC | 4 |
| 19 | | MO/SN | FBNC (SNCU MO /SN0 4+14 | MO/SN | HFWTC | 4+14 |
| 20 | | MO | IMNCI MO | MO | HFWTC | 5 |
| 21 | | SN/ANM | IMNCI SN/ANM/Other Para | SN/ANM | HFWTC | 5 |
| 22 | | MO Ped. | F-IMNCI MO/Paed | MO Ped. | HFWTC | 5 |
| 23 | | SN | F-IMNCI SN | SN | HFWTC | 5 |
| 24 | | MO/ANM/SN/CHO/ASHA | One Day Premonsoon Training | MO/ANM/SN/CHO/ASHA | DTT/HTT | 1 |
| 25 | | MO | Training under RI MO | MO | HFWTC | 1 |
| 26 | | HA/ANM/MPW | Training under RI PM Corp. | HA/ANM/MPW | HFWTC | 1 |
| 27 | | Cold Chain handler | Training under RI Cold Chain handler | Cold Chain handler | HFWTC | 1 |
| 28 | | Asha/Mo/ANM/LH | Training under RI bridge Training Corp. | Asha/Mo/ANM/LH | HFWTC | 1 |
| 29 | | THO/ADHO/Dist. NO/ | WIFS (District) | THO/ADHO/Dist. NO/ | HFWTC | 1 |
| 30 | | MO/NO/ICDS Sup./HA/MPW | WIFS (Copr) | MO/NO/ICDS Sup./HA/MPW | HFWTC | 1 |
| 31 | | MO/NO/ICDS Sup./HA/MPW/ANM | WIFS (Block) | MO/NO/ICDS Sup./HA/MPW/ANM | HFWTC | 1 |
| 32 | | THO/ MO/ BCM/ Counsellor | MHS (District) | THO/ MO/ BCM/ Counsellor | HFWTC | 1 |
| 33 | | MO/HA/ ANM/ AMW/ Asha Supe. | MHS (Block) | MO/HA/ ANM/ AMW/ Asha Supe. | HFWTC | 1 |
| 34 | | Peer Educators/ Asha | Peer Educators (Block Level) | Peer Educators/ Asha | HFWTC | 1 |
| 35 | | MO/Gyne/OBYG | Laparoscopic (MO) | MO/Gyne/OBYG | HFWTC | 12 |
| 36 | | MO/Gyne/OBYG | Laparoscopic Refresher) | MO/Gyne/OBYG | HFWTC | 3 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 37 | | MO/Gyne/OBYG | Minilap (MO) | MO/Gyne/OBYG | HFWTC | 12 |
| 38 | | MO/Gyne/OBYG | Minilap (Refresher) | MO/Gyne/OBYG | HFWTC | 3 |
| 39 | | MO MBBS | NSV (MO) | MO MBBS | HFWTC | 4 |
| 40 | | MO MBBS | NSV (Refresher) | MO MBBS | HFWTC | 4 |
| 41 | | Mo | PPIUCD + IUCD (MO) | MO/Gyne/OBYG/Nur Tutor/SN | HFWTC | 5 |
| 42 | | MO Ayush | PPIUCD+ IUCD (AYUSH MO) | MO/Gyne/OBYG/Nur Tutor/SN | HFWTC | 5 |
| 43 | | SN/ANM/LHV | PPIUCD + IUCD (ANM/SN) | SN/ANM/LHV | HFWTC | 5 |
| 44 | | SN/ANM/LHV | Antra SN/ANM/LHV | SN/ANM/LHV | HFWTC | 1 |
| 45 | | SN/ANM/LHV | Antra CHO | SN/ANM/LHV | HFWTC | 1 |
| 46 | | NRC FSAM MO/Nutritional Councellor/ SN | NRC FSAM MO/Nutritional Councellor/ SN | NRC FSAM MO/Nutritional Councellor/ SN | HFWTC | 1 |
| 47 | | MO/SN/LHV/ANM | IYCF (Tribal Dist) | MO/SN/LHV/ANM | HFWTC | 1 |
| 48 | | MO/SN/LHV/ANM | IYCF SN/ANM Dist/Corp | MO/SN/LHV/ANM | HFWTC | |
| 49 | HSSU | Training of RKS / JAS member of UPHCs | JAS | Training of RKS / JAS member of UPHCs | HFWTC | 2 |
| 51 | | MO,SN,ANM.LHV | Training Institutes and Skill Labs | MO,SN,ANM.LHV | Jalna, Pune, Nashik | 6 |
| 52 | | MO in ICU | Creating Master Trainers for ALS/BLS trainings | MO in ICU | HFWTC | 4 |
| 53 | | SN in ICU | Creating Master Trainers for ALS/BLS trainings | SN in ICU | HFWTC | 4 |
| 54 | | MO/SN/CHO/ANM | Snake Bite Prevention | MO/SN/CHO/ANM | HFWTC (07) | 1 |
| 55 | | ADHO (IDSP), Epidemiologist, Data manager | IHIP/IDSP training | ADHO (IDSP), Epidemiologist, Data manager | HFWTC Pune | 1 |
| 56 | | Ayush AAM MO | Ayush MO Refresher Training | Ayush AAM MO | HFWTC | 1 |

| Sr. No. | Cadres | Courses | Nature of participants | Venue | Duration of the course (Days) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MO/SN/ANM | NSSK Training | MO/SN/ANM | DTT/HTT | 2 |
| 2 | MO/SN | F-IMNCI Training | MO/SN | DTT/HTT | 5 |
| 3 | MO/SN/ANM | IMNCI Training | MO/SN/ANM | DTT/HTT | 5 |
| 4 | Peer Educator | Online Adolscent Friendly Health Services Peer Educator Training | MO/ANM | DTT/HTT | 6 |
| 5 | MO (MBBS) | NSV Training | MO (MBBS) | DTT/HTT | 5 |
| 6 | MO/SN/ANM/LHV | IUCD/PPIUCD Training | MO/SN/ANM/LHV | DTT/HTT | 5 |
| 7 | CHO/SN/ANM/LHV | ANTARA Training (Online Mode) | CHO/SN/ANM/LHV | DTT/HTT | 1 |
| 8 | MO/SN/ANM | IYCF Training | MO/SN/ANM | DTT/HTT | 2 |
| 9 | MO/ANM/SN/LSO | RTI/STI Training | MO/ANM/SN/LSO | DTT/HTT | 2 |
| 10 | MO/ANM/SN/CHO/ASHA | One Day Premonsoon Training | MO/ANM/SN/CHO/ASHA | DTT/HTT | 1 |
| 11 | MO/ANM/SN/CHO/ASHA | RI Training | MO/ANM/SN/CHO/ASHA | DTT/HTT/nodal training centre corporation | 3 |
| 12 | MO/ANM/SN/CHO/ASHA | WIFS Training at district / CORP /block | MO/ANM/SN/CHO/ASHA | DTT/HTT/nodal training centre corporation / block | 1 |
| 13 | MO/ANM/SN/CHO/ASHA | (Online Mode) Menstrual Hygiene Training at district / CORP /block | MO/ANM/SN/CHO/ASHA | DTT/HTT/nodal training centre corporation / block | 1 |
| 14 | MO/ANM/SN/CHO | GDM Training | MO/ANM/SN/CHO | HFWTC (Amravati, Ch. Sambhajinagar) | 2 |